# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१५

**अधिसूचना क्रमांक : एसएसएम ०५१५/सीआर-६/२०१५/तीन** **जाहिरात क्रमांक ८२/२०१५**

जाहिरात क्रमांक -२१६/२०१४, दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील विविध पदांवरील / सेवांमधील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. ५ एप्रिल, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१५** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१५ दिनांक १२, १३ व १४ सप्टेंबर, २०१५** पासून **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या केंद्रावर घेण्यात येईल.

२. उपलब्ध पदसंख्या :-

| (१) उप जिल्हाधिकारी, गट-अ (एकूण ९ पदे) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र | शै. व सा.मा. प्रवर्ग | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| पदसंख्या | ३* | ३* | १* | १* | -- | -- | -- | १* | -- | ९ | -- | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | २ | २ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | ६ | -- | ६ |
| (२) महिला | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | ३ | -- | ३ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(२) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ (एकूण १३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | २* | ३* | १* | -- | १* | -- | ६* | -- | -- | १३ | -- | १३ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | २ | १ | -- | १ | -- | ४ | -- | -- | ९ | -- | ९ |
| (२) महिला | १ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | -- | ४ | -- | ४ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(३) सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | १ | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी /गट विकास अधिकारी ,गट-अ (एकूण २१ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १+४* | १+२* | १* | १* | -- | -- | १+२* | १+२* | १* | १७ | ४ | २१ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ५ | ३ | १ | १ | -- | -- | ३ | ३ | १ | १७ | ३ | २० |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(५) सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ, (एकूण १५ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १+२* | १+१* | १ | -- | -- | -- | १+१* | १* | १ | १० | ५ | १५ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | १ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२) महिला | ३ | १ | १ | -- | -- | -- | १ | १ | -- | ७ | ४ | ११ |
| (३) खेळाडू | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | २ | १ | ३ |
| **(६) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट अ (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(७) तहसिलदार, गट-अ (एकूण १० पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १* | -- | १* | -- | १* | १* | -- | १* | १* | ६ | ४ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | १ | १ | ४ | २ | ६ |
| (२) महिला | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(८) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी , गट-ब (एकूण १३ पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १ | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | ५ | ८ | १३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | ४ | ५ | ९ |
| (२) महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | ४ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(९) कक्ष अधिकारी , गट-ब (एकूण ३६+२# = ३८ पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | ५ | ३ | -- | -- | -- | १ | ३ | २ | -- | १४ | २४ | ३८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ४ | २ | -- | -- | -- | १ | २ | १ | -- | १० | १६ | २६ |
| (२) महिला | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | १ | -- | ४ | ७ | ११ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१०) सहायक गट विकास अधिकारी , गट-ब (एकूण ९ पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १ | -- | -- | १ | -- | -- | ४* | -- | -- | ६ | ३ | ९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | -- | -- | १ | -- | -- | ३ | -- | -- | ५ | २ | ७ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(११) मुख्याधिकारी, नगरपालिका/परिषद गट-ब (एकूण १८५ पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | २० | ११ | ७ | ४ | ५ | ५ | ३५ | ५ | -- | ९२ | ९३ | १८५ |
| | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १४ | ८ | ५ | ३ | ४ | ४ | २५ | ४ | -- | ६७ | ५५ | १२२ |
| (२) महिला | ६ | ३ | २ | १ | १ | १ | १० | १ | -- | २५ | २८ | ५३ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १० | १० |
| अपंग (एकूण ६ पदे) (१) अंध / अल्पदृष्टी - २ पदे (२) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - ३ पदे (३) कर्णबधीर - १ पद | | | | | | | | | | | | |
| **(१२) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट ब (एकूण ८ पदे))** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १* | २* | -- | -- | -- | १* | -- | १* | -- | ५ | ३ | ८ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | २ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ५ | ३ | ८ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(१३) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(१४) सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **(१५) नायब तहसिलदार, गट-ब (एकूण ३७ पदे)** | | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | २ | -- | ४ | १ | -- | १ | ४ | -- | ४ | १६ | २१ | ३७ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १ | -- | ३ | १ | -- | १ | १ | -- | ३ | १० | १४ | २४ |
| (२) महिला | १ | -- | १ | -- | -- | -- | २ | -- | १ | ५ | ६ | ११ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | २ |
| *** अनुशेषाची पदे # महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील पदे** | | | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिला व खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.३** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), व भ.ज. (ड), वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदांसाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**२.५** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांना देय असलेली वय/परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात उमेदवारांनी सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अ मागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**२.६** खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक संचालनालय, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**२.७** विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.८** विकलांग उमेदवारासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.९** विकलांग उमेदवाराची आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे ; याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

**२.१०** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**२.११** विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत यासंदर्भात संबधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्ररित्या पत्राव्दारे विनंती करणे अनिवार्य आहे.

**२.१२** उपरोक्त पदांपैकी कक्ष अधिकारी, गट ब वगळता अन्य सर्व पदांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० लागू आहे.

**३. परीक्षेचे टप्पे**

(१) लेखी परीक्षा :- एकूण ८०० गुण. (२) मुलाखत :- १०० गुण.

**४. वेतनश्रेणी :-** ४.१ गट -अ च्या पदांकरिता रुपये १५,६००-३९,१००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.
४.२ गट-ब च्या पदांकरिता रुपये ९,३००-३४,८००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**५ पात्रता**

**५.१. भारतीय नागरिकत्व**

**५.२ वयोमर्यादा :-**

**५.२.१** उपरोक्त पदाकरिता दिनांक **१ एप्रिल, २०१५** रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**५.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.
(२) पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.
(३) माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत.
(४) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत.
(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.३ शैक्षणिक अर्हता :-**

५.३.१ उपलब्ध पदसंख्येतील सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ, तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी , गट-ब ही दोन पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

५.३.२ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा
(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परिक्षा उत्तीर्ण, किंवा
(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा
(४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा
(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

५.३.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी किंवा भौतिक शास्त्र व गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी.

५.३.४ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१५ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१५ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ पर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.३.५ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक १३ ऑगस्ट, २०१५** पर्यंत सदर अट पूर्ण केली असली पाहिजे.

५.३.६ सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

**५.४ शारीरिक मोजमापे/अर्हता**

**पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ, अधीक्षक, गट-अ व उप अधिक्षक, गट-ब राज्य उत्पादन शुल्क, तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,गट-ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवारांची शारीरिक मोजमापे/अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे :-**

**५.४.१ पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**५.४.२ अधीक्षक, गट-अ व उप अधिक्षक, गट-ब राज्य उत्पादन शुल्क,**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**५.४.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. (कमीत कमी) फुगविण्याची क्षमता - किमान ५ से.मी. आवश्यक, चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगाधंळेपणा नसावा. | उंची - १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगाधंळेपणा नसावा. |

५.५ उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५.३.२, ५.३.३ व ५.४ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता (लागू असेल त्याप्रमाणे) अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

५.६ **अपंग उमेदवारांसाठी पात्रता** :- शासनाने संबंधित पदासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**६. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

६.१ राज्य सेवा (पूर्व) परीक्षा २०१५ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक १३ ऑगस्ट**, **२०१५** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमदेवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.२ पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत नव्हते परंतु **दिनांक १३ ऑगस्ट, २०१५** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमदेवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

६.३ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती सादर करणे आवश्यक राहील.

६.४ पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जादवारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

**७. शुल्क** : ७.१ अमागास - ५१५/- ७.२ मागासवर्गीय - ३१५/-

**८. अर्ज करण्याची पद्धत :-**

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी माहिती फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) माहिती https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ३० जुलै, २०१५ ते दिनांक १३ ऑगस्ट, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८.४ विहित पद्धतीने आयोगास माहिती सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

८.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

८.५.१ मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

८.५.२ "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर **"माझे ॲप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.**

८.५.३ **" Pay Now "** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. **(अ)** ऑनलाईन पेमेंट **(ब)** नागरी सुविधा केंद्र **(क)** चलनाव्दारे

८.५.४ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

८.५.५ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

८.५.६ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

८.५.७ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निडल्यास अर्ज/माहिती सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज/माहिती सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

८.५.८ **ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक आहे.** अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

८.५.९ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

## ९. केंद्र निवड :-

**९.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर परीक्षाकेंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता "माझे खाते" या लिंक वर क्लिक करुन 'माझे ॲप्लिकेशन' सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' मधील संबंधित पदाची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राच्या क्षमते इतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील तर सदर केंद्र उपलब्ध नसून दुसरे केंद्र निवडावे असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.**

**९.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.**

## १०. प्रवेशप्रमाणपत्र

१०.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवारांच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्पर्धा परीक्षेअंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** तसेच परीक्षा विभागातील **"राज्य सेवा परीक्षा"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१२.** विहित पध्दतीने **माहिती** सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही **दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१३.** चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १४ ऑगस्ट, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

**१४.** सदर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ३० जुलै, २०१५

सुचिता ज. परब
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.